विधि व न्याय विभाग

पाचवा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मार्च २०२५.

अधिसूचना

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.

क्रमांक न्यास्थाप-११२३/प्र.क्र.२१३/कार्यासन-११.– भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे, यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनियम केल्यानंतर, असे निर्देश देत आहे की, दिनांक ८ मार्च २०२५ पासून ,–

(क) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर या ठिकाणी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय स्थापन करण्यात येईल ;

(ख) एकतर स्पष्टपणे किंवा ध्वनितरित्या मनाई केली आहे अशी प्रकरणे वगळून, यासोबत जोडलेल्या *अनुसूचीमध्ये* विनिर्दिष्ट केलेल्या गावांमध्ये उद्भवणारी आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्याकडे दाखल केलेली व निर्णय करण्यात येत असलेली फौजदारी प्रकरणे ही प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांच्या न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात येतील ; आणि

(ग) एकतर स्पष्टपणे किंवा ध्वनितरित्या प्रतिबंध केला असेल अशी प्रकरणे वगळून, यासोबत जोडलेल्या *अनुसूचीमध्ये* विनिर्दिष्ट केलेल्या गावांमध्ये उद्भवणारी फौजदारी प्रकरणे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांच्या न्यायालयामध्ये दाखल करण्यात येतील व तेथे चालविण्यात येतील.

IndiaCode

अनुसूची

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या अधिकारितेतून वगळलेली आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांच्या अधिकारितेत समाविष्ट केलेल्या गावांची यादी.

अ. क्र.	गावाचे नाव	अ. क्र.	गावाचे नाव
१	खारी	११	वरसावे
२	गोडदेव	१२	राई-मुर्धे
३	घोडबंदर	१३	मुर्धे
४	पेणकरपाडा	१४	मोरवा
५	मिरा	१५	उत्तन
६	काशी	१६	डोंगरी
७	नवघर	१७	तारोडी
८	भाईंदर	१८	पाली
९	महाजनवाडी	१९	चौक
१०	चेणे		

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास वसंत गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-*नि*-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 4th March 2025.

NOTIFICATION

BHARTIYA NAGRIK SURAKSHA SANHITA, 2023.

No.NYASTHAP-1123/C.R.213/DESK-11. –In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of the section 8 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023), in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all the earlier notifications, issued in this behalf, in so far as they relate to the Court of Judicial Magistrate, First Class, Thane, in District Thane, the Government of Maharashtra, after consultation with the High Court of Judicature at Bombay, hereby, directs that, with effect from the 8th March, 2025,–

(*a*) Mira-Bhayander in Thane District, to be the place where the Court of Judicial Magistrate, First Class, shall be established ;

(*b*) The criminal cases arising out of the villages mentioned in Schedule appended hereto, being filed and dealt with by the Court of Judicial Magistrate, First Class, Thane, except the cases, the cognizance of which is either expressly or impliedly barred, shall stand transferred to the Court of Judicial Magistrate, First Class, Mira-Bhayander ;

(*c*) The criminal cases arising out of villages mentioned in *Schedule* appended hereto, except the cases, the cognizance of which is either expressly or impliedly barred, shall be filed and dealt with by the Court of the Judicial Magistrate, First Class, Mira-Bhayander.

Schedule

List of villages excluded from the Jurisdiction of the Court of Judicial Magistrate, First Class, Thane and included in the Jurisdiction of the Court of Judicial Magistrate, First Class, Mira-Bhayander.

Sr. No.	Name of the Villages	Sr. No.	Name of the Villages
1	Khari	11	Varsave
2	Ghoddeo	12	Rai-Murdhe
3	Ghodbunder	13	Murdhe
4	Penkarpada	14	Morva
5	Mira	15	Uttan
6	Kashi	16	Dongri
7	Navghar	17	Tarodi
8	Bhayander	18	Pali
9	Mahajanwadi	19	Chowk
10	Chene		

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor- *cum*- Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.